# जुन्या जीन्स संकलन-पुनर्वापर उपक्रम

नमस्कार,

आज आपल्याला अनेकदा निसर्गाचा उद्रेक होताना दिसतो. या अकाल घडणाऱ्या घडामोडींना मानव निर्मित अनेक कारणे निश्चितच जबाबदार आहेत म्हणूनच निसर्गाचा आनंद घेताना आपण वापरत असणाऱ्या वस्तूंनी त्याची हानी तर होत नाही ना? घातक वस्तूंची योग्य विल्हेवाट लागत आहे का? हे पाहणे आपल्या सर्वांचेच प्राथमिक कर्तव्य आहे. हा विचार आपल्या प्रत्येक बाल-शिशु पर्यंत पोहोचावा आणि यातून पर्यावरण जतन करण्याच्या दिशेने प्रत्येकाने एक पाऊल टाकावे या उद्देशाने Green Audit committee आणि IQAC यांनी पूर्णम इकोविजन यांच्या सहयोगाने आपल्या येथे दिनांक १०.१०.२०२२ ते १५.१०.२०२२ पर्यंत खाली दिलेल्या वेळेत जुने जीन्सचे संकलन असा कार्यक्रम आयोजित केला होता. दिनांक १४ रोजी अशा कपड्यांपासून तयार केलेल्या वस्तूंचे प्रदर्शनही आयोजित केले होते.

जुन्या कपड्यांची विनियोग पश्चात योग्य विल्हेवाट हि अत्यंत आवश्यक असून आपण या मार्फत काही प्रमाणात पर्यावरण हानी निश्चितच रोखू शकू.

